---

एका महिलेने ॲम्ब्युलन्स बोलावण्यासाठी फोन केला...

ऑपरेटर : बोला... तुमची काय समस्या आहे?

महिला : माझा पाय टेबलाला आपटला...

ऑपरेटर : अहो... यासाठी तुम्ही ॲम्ब्युलन्स बोलवताय?

महिला : नाही, ॲम्ब्युलन्स तर माझ्या नवऱ्यासाठी बोलावतेय...

यावर त्याला हसायची बिलकूल गरज नव्हती.

---

चंगू आणि त्याची बायको गप्पा मारत बसलेले असतात...

बायको : अहो... मी केव्हापासून विचारतेय तुम्हाला..

तुमच्या जीवनातली सर्वात मोठी समस्या कोणती?

सांगा ना... तुम्ही फक्त माझ्याकडेच बघत बसलायत..

काही बोलत का नाही?

---

चंगू : आज तर ना गैरसमज होण्याचीही हद्दच झाली राव...

मंगू : काय रे काय झालं...?

चंगू : माझी बायको माझ्यावर रुसली आहे

आणि तिनं माझ्याशी अबोला धरलाय...

तिला वाटतंय तिनं मला शिक्षा दिलीये...

---